**अपर पोलीस महासंचालक व संचालक कार्यालय,**
**पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.**
डॉ.होमी भाभा रोड, चव्हाणनगर, पुणे ४११००८
दूरध्वनी : ०२०-२५६५६९०८ (कार्यालय), ०२०-२५६५२५० (जनरल),
फॅक्स : ०२०-२५६५७९७४, ईमेल : dirpolwireless.pune@nic.in

क्र.आस्था-२/ई-४/ससाब-२०/पोहवा(क.म.)/२०२०/4451 पुणे, दिनांक : 29 /०९/२०२०

विषय :- पोलीस हवालदार (कर्मशाळा मदतनीस) यांच्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या-२०२०

संदर्भ :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१
२) कार्यालयीन प्रस्ताव क्र.ई/प्रलि-२/स.सा.बदल्या/बि.सं.वि./अधिकार/२०२०/८५७, दिनांक १०/०२/२०२० व क्र.ई/प्रलि-२/स.सा.बदल्या/बि.सं.वि./अधिकार/२०२०/३६८५, दिनांक २८/०७/२०२०

--- ००० ---

**आदेश :-**

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २२ न (२) मधील विशेषीकृत अभिकरण या सदराखाली पोलीस बिनतारी संदेश विभागाचा समावेश करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अधीन राहून पोलीस आस्थापना मंडळ यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन, गठीत समितीने केलेल्या शिफारशीनुसार, खालील पोलीस हवालदार(कर्मशाळा मदतनीस) यांच्या त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे बदल्या करण्यात येत आहे.

**भाग-१ : प्रशासकीय बदल्या (विहित कालावधी पूर्ण झालेले)**

| अ.क्र. | पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) यांचे नाव | सध्याचे नेमणूकीचे ठिकाण / आस्थापना | बदलीवर नेमणूकीचे ठिकाण/ आस्थापना |
|---|---|---|---|
| १ | सुभाष महारुद्र नाईक | पुणे शहर<br>पोलीस आयुक्त, पुणे शहर | दि.३१/१०/२०२० रोजी सेवानिवृत्त होत असल्याने सेवानिवृत्तीपर्यंत मुदतवाढ |

**भाग - २ : विनंतीवरुन बदल्या.**

| अ.क्र. | पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) यांचे नाव | सध्याचे नेमणूकीचे ठिकाण / आस्थापना | बदलीवर नेमणूकीचे ठिकाण/ आस्थापना |
|---|---|---|---|
| १ | रत्नाकर दामोदर नारनवरे | औरंगाबाद शहर<br>पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | गडचिरोली<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली |
| २ | विनोद महादेव झाडे | ठाणे शहर<br>पोलीस आयुक्त, ठाणे शहर | नागपूर शहर<br>पोलीस आयुक्त, नागपूर शहर |

२. ज्या पो.ह.(कर्मशाळा मदतनीस) यांची विनंतीवरुन बदली करण्यात आलेली आहे, त्यांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

३. संबंधित घटक प्रमुखांनी उपरोक्त बदली झालेल्या पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) यांना बदलीवर सोडताना पर्यायी/ बदलीवर येणाऱ्या पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) यांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणूकीच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच सदर पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) यांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक उलटटपाली या कार्यालयास निश्चितपणे कळवावा.

४. उपरोक्त आदेशान्वये पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) यांची बदली ज्या घटक कार्यालयात दर्शविण्यात आली आहे, तेथे सदर पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) हजर होण्याची जबाबदारी बदलून गेलेल्या पोलीस घटक कार्यालयाची

राहिल, याची नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा. विहित वेळेत हजर न होणाऱ्या पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

५. संबंधित घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात बदलून येणारे जे पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) या आदेशानुसार बदलीवर नेमणूकीच्या ठिकाणी हजर होणार नाही, त्यांची नावे कृपया या कार्यालयास कळवावीत. तसेच त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील अशा पो.हवा.(कर्मशाळा मदतनीस) यांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात यावे आणि त्याबाबतचा अहवालदेखील या कार्यालयास सादर करावा.

Ritesh

**( रितेश कुमार )**
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

पोलीस आयुक्त, पुणे शहर / ठाणे शहर / औरंगाबाद शहर / नागपूर शहर.
पोलीस अधीक्षक, गडचिरोली

प्रत : पोलीस अधीक्षक बि.सं., पूर्व विभाग, नागपूर / पश्चिम विभाग, पुणे.
पोलीस उप आयुक्त, बि.सं.विभाग, मुंबई.
परिक्षेत्रीय पोलीस उप अधीक्षक बि.सं., कोकण / कोल्हापूर / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर / नांदेड परिक्षेत्र
सहायक पोलीस आयुक्त, पुणे शहर / ठाणे शहर / नागपूर शहर
पोलीस निरीक्षक बि.संदेश, औरंगाबाद शहर / गडचिरोली
पोलीस निरीक्षक बि.सं., गो.न.पा.यो., पुणे (संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी)
प्रभारी अधिकारी, परवाना शाखा, संचालक कार्यालय, पुणे (राजपत्रामध्ये प्रसिद्धीसाठी)